जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2026
पुढारी

सायबर महाविद्यालयातील परिषदेत ५५ संशोधन निबंधांचे सादरीकरण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सायबर महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर विभागातर्फे 'इनोव्हेशन इन कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी' या विषयावर आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद झाली. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले. डॉ. समीर नानीवाडेकर यांनी बीजभाषण केले. परिषदेत ५५ संशोधन निबंधांचे सादरीकरण झाले. अमेरिका, ब्राझील, युक्रेन, तुर्की, व्हिएतनाम, इटली, मलेशिया व पोर्तुगाल या देशांतील तज्ज्ञांनी ऑनलाईन सहभाग घेत मार्गदर्शन केले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. के. मस्के यांच्या उपस्थितीत परिषदेचा समारोप झाला. यावेळी सायबरचे संचालक डॉ. आर. के. टेलर, डॉ. रजनी कामत, प्रा. महंतेश पाटील व प्रा. मृदुला पाटकर उपस्थित होते. प्रा. देवयानी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. श्रुती जामसांडेकर व डॉ. टी. व्ही. जी. शर्मा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2026

पुण्यनगरी

'डॉ. घाळी'मध्ये राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन

गडहिंग्लज : प्रतिनिधी

येथील डॉ. घाळी कॉलेजमध्ये हिंदी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि शिवाजी विद्यापीठ हिंदी प्राध्यापक परिषद कोल्हापूर यांच्या वतीने शनिवारी (दि. १७) 'हिंदी साहित्य में चित्रित किन्नर समुदाय : परंपरा, वर्तमान और भविष्य' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी व हिंदी प्राध्यापक परिषदेचे अकरावे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाच्या तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी मंडळाच्या पुणे विभागाच्या सदस्या मयुरीताई आळवेकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी हिंदीतील प्रसिद्ध लेखिका डॉ. मधू कांकरिया बीजभाषण करणार आहेत. डॉ. सुनील बनसोडे आणि डॉ. नाजिम शेख यांची विशेष उपस्थिती आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी असणार आहेत.

संगोष्ठीच्या निमित्ताने देशभरातील अनेक प्राध्यापक मान्यवरांचे शोध लेख सादरीकरण आणि संशोधन पत्रिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. किन्नर समुदायाचे जीवन, संघर्ष, अस्मिता, सामाजिक स्थान आणि अधिकार यांचे हिंदी साहित्यातील चित्रण अभ्यासणे, तसेच या समुदायाच्या परंपरा, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यकालीन वाटचालीवर विचारमंथन करणे हा या राष्ट्रीय संगोष्ठीचा प्रमुख उद्देश आहे.